Pimpalner Education Society's

KARM. A. M. PATIL ARTS, COMMERCE AND

KAI. ANNASAHEB N. K. PATIL SCIENCE SENIOR COLLEGE,

PIMPALNER, TAL. SAKRI, DIST. DHULE.

e-mail: kamp_sr_college@yahoo.in
Phone: 02561-223010

Web: http://www.kampsrcollege.org.in
Offg. Prin. K. D. Kadam

Outward No: Date: / /202

# A Report on Workshop on Personality Development Jointly Organized by Student Development Department & Sakal Media, YIN Sponsored by Gillet Group: Date 14/09/2019

कर्म. आ. मा. पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासो एन. के. पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभाग व जिलेट प्रस्तुत यिन अंतर्गत, सकाळ माध्यम समुह यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४/०९/२०१९ रोजी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस जिल्हा अपर पोलिस अधिक्षक डॉ. राजू भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करतांना ध्येय साध्य होई पर्यंत प्रयत्न करा. स्पर्धा परिक्षा हे करीयर करण्यासाठी सर्वोत्तम क्षेत्र आहे. त्यामुळे समाजाच्या अनेक घटकांशी संपर्क येतो. त्यातून समाजाची खऱ्या अर्थाने सेवा करता येते. या परिक्षांसाठी विद्यार्थी खुप हुशारच असावा असे नाही तर त्यासाठी सातत्य, संयम आणि कठोर परिश्रम यांची आवश्यकता असते. त्यातून अंतिम ध्येय साध्य करता येते असे त्यांनी स्वतःचे उदाहरण देत सांगीतले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून पिंपळनेर पोलिस स्टेशनचे ए. पी. आय. श्री. पंजाबराव राठोड होते. अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे म्हणाले की, पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवाचे शिक्षण अधिक शिकविते. त्यातून खऱ्या अर्थाने माणूस घडतो. यशस्वी होण्यासाठी मनाशी खुणगाठ बांधा असे आव्हान त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन यिन समन्वयिका जागृती बोरसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके, प्रा. डॉ. राम पेटारे, प्रा. डॉ. डब्लू. बी. शिरसाठ, प्रा.के. डी. कदम हे प्रयत्नशील होते.

## Contact Details of Resource Persons

| Sr. No. | Resource Persons | Mobile |
|---|---|---|
| 01 | Hon. Dr. Raju Bhujabal (DYSP, Dhule) | -- |
| 02 | Hon. Panjabrao Rathod (PI, Pimpalner) | 8888813233 |
| 03 | Miss. Jagruti Borase (Sakal Media) | 9130011520 |

Co-ordinator
IQAC
Karm.A.M.P.Art's,Comm.&
Kai.Annasaheb N.K.Patil Science
Sr.College,Pimpalner Tal.Sakri Dist.Dhule

Principal
Karm.A.M.Patil Arts,Comm.& Science
Sr.College,Pimpalner Tal.Sakri (Dhule)

# व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

दि. १४/०९/२०१९







कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संलग्नीत
संचलित
कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य आणि
कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान
पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे
विद्यार्थी विकास
आयोजित
विकास कार्यशाळा
नॅक पुनर्मुल्यांकीत 'ब' श्रेणी प्राप्त
कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय,


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संलग्नीत
पिंपळनेर एज्युकेशन सोसायटी,संचलित
नॅक पुनर्मुल्यांकीत 'ब' श्रेणी प्राप्त
कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य आणि कै.अण्णासाहेब एन.के.पाटील
विज्ञान महाविद्यालय,पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे
सुस्वागतम्
विद्यार्थी विकास
आयोजित
विकास कार्यशाळा


GYMKHANA OFFICE

दै. सकाळ दि. १६ सप्टेंबर २०१९

सकाळ

# ध्येय साध्य होईपर्यंत प्रयत्न करा

## डॉ. राजू भुजबळ : 'यिन'तर्फे पिंपळनेरला करिअरवर मार्गदर्शन

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver
सकाळ
Gillette Guard

पिंपळनेर, ता. १५ : जीवनात करिअरच्या अनेक संधी आहेत. स्पर्धा परीक्षा हे करिअर करण्यासाठी सर्वोत्तम क्षेत्र आहे. त्यामुळे समाजाच्या अनेक घटकांशी संपर्क येतो. त्यातून समाजाची खऱ्या अर्थाने सेवा करता येते. या परीक्षांसाठी विद्यार्थी खूप हुशारच असावा, असे नाही तर त्यासाठी सातत्य, संयम आणि कठोर परिश्रमांची गरज असते. त्यातून अंतिम ध्येय साध्य करता येते. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना ध्येय साध्य होईपर्यंत प्रयत्न करा, असे आवाहन जिल्ह्याचे अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. राजू भुजबळ यांनी केले.




पिंपळनेर : 'सकाळ- यिन' व 'जिलेट गार्ड'तर्फे शनिवारी कर्मवीर आ. मा. पाटील महाविद्यालयात झालेल्या करिअर मार्गदर्शन शिबिरास विद्यार्थ्यांसह उपस्थित अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. राजू भुजबळ, सहाय्यक पोलिस निरीक्षक पंजाबराव राठोड, उपनिरीक्षक भाऊसाहेब नन्हे, प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे व प्राध्यापक. (छायाचित्र : अंबादास बेनुसकर)

'सकाळ', यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क अर्थात 'यिन', जिलेट गार्डतर्फे येथील कर्मवीर आ. मा. पाटील कला, वाणिज्य व एन. के पाटील विज्ञान महाविद्यल्यात काल (ता. १४) व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा झाली, तीत ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे अध्यक्षस्थानी होते. येथील पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक पंजाबराव राठोड, उपनिरीक्षक भाऊसाहेब नन्हे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे होते.

प्राचार्य डॉ. सोनवणे म्हणाले, की विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवाचे शिक्षण अधिक शिकविते. त्यातून खऱ्या अर्थाने माणूस घडतो. जीवनात एखादे ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रमांची गरज असते. आपले ध्येय निश्चित करून प्रत्येकाने त्यात यशस्वी होण्यासाठी मनाशी खूणगाठ बांधावी. 'सकाळ'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याचा स्तुत्य प्रयत्न होत असून, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे काम 'सकाळ' समूह करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय खोडके, प्रा. राम पेटारे, प्रा. डॉ. डब्ल्यू. बी. शिरसाट, प्रा. डॉ. के. डी. कदम, 'यिन'चे सदस्य ललितेश गायकवाड, मनोज अमृतकर, मनोहर बोरसे आदींनी संयोजन केले. प्रा. एस. के. काकड, प्रा. के. आर. राऊत, प्रा. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. डॉ. पी. पी. तलवारे, प्रा. व्ही. जी. उगलमुगले, प्रा. डॉ. एन. बी. सोनवणे, प्रा. वाय. एम. नांद्रे, प्रा. सी. एन. घरटे, प्रा. एस. एन. तोरवणे व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. 'यिन'च्या जिल्हा समन्वयिका जागृती बोरसे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

> अलीकडच्या काळात ग्रामीण भागातील विद्यार्थीही स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध पदांवर पोहोचत आहेत. हे चित्र आशादायक आहे. अन्य विद्यार्थ्यांनीही अशाच ध्येयाने प्रेरित होऊन जीवनात यश मिळविण्यासाठी पुढे यावे. महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच आपले ध्येय निश्चित करावे. जेणेकरून ते साध्य करताना आपल्याला योग्य दिशा मिळेल.
>
> - डॉ. राजू भुजबळ, अप्पर पोलिस अधीक्षक, धुळे

Jalgaon, Dhule-Today
16/09/2019 Page No. 3